# ‘पद्मावत’ चित्रपट बकवास आणि भंपक भन्साळींनी बाजार बसवलाय तो उठवा

**संपादकीय**

**जयश्री खाडिलकर-पांडेकृत**

संजय लीला भन्साळी यांचा ‘पद्मावत’ चित्रपट विरोधामुळेच जास्त गाजला हे चित्रपट पाहिल्यावर लक्षात आले. कोणत्याही वादाशिवाय ‘पद्मावत’ प्रदर्शित झाला असता तर प्रदर्शनाच्या दुसऱ्याच दिवशी चित्रपटगृहे ओस पडली असती. भन्साळींना कदाचित हे ठाऊक असावे. म्हणूनच या चतुर माणसाने ‘पद्मावत’ची तिकिटे हजार रुपयांवर नेली आणि दोन दिवसांतच किमान अर्धा खर्च खेचून घेतला. पण पैसा ओढण्याची ही चतुराई आणि शहाणपण दिग्दर्शनात वापरले असतं तर बरं झालं असतं. दुर्दैवाने भन्साळींचं शहाणपण शेण खायला गेले आणि एक अत्यंत बकवास आणि भंपक चित्रपट प्रेक्षकांच्या माथी मारला गेला.

‘पद्मावत’ चित्रपटात केवळ पैसा ओतला आहे. पैसा ओतून भव्यदिव्य सेट उभारायचे, भरजरी वेषभूषा द्यायची आणि प्रेक्षकांना दिपवून टाकायचे, हा भन्साळींचा फॉर्म्युला आहे. पण ‘पद्मावत’मध्ये हा फॉर्म्युला पूर्णपणे आपटला आहे. याचे कारण भव्यदिव्य दाखवताना ढिसाळ कथानक, सुमार संवाद आणि प्रतिमांची मोडतोड इतकी झाली आहे की, आपण काय पाहायला आलो आणि हे काय पाहतोय असं वाटतं. चित्रपटगृहातून बाहेर पडताना रजपूतांची शान लक्षात राहत नाही. केवळ अल्लाउद्दीन खिलजीचे जे माकडचाळे दाखवले आहेत, तेवढेच लक्षात राहतात. ज्या अल्लाउद्दीन खिलजीने भारतभर मोठे हल्ले चढविले तो अल्लाउद्दीन खिलजी वासनांध आणि थिल्लर दाखविला आहे. एखाद्या ‘क’ दर्जाच्या हिंदी चित्रपटातील खलनायक रंगवावा तसा अल्लाउद्दीन खिलजी उभा केला आहे. त्याचे खाणे, त्याचे हावभाव, त्याचे चाळे बघून हा चाणाक्ष योद्धा आहे असे वाटतच नाही. यावर कहर म्हणजे अल्लाउद्दीन खिलजीला ‘खलबली’ गाण्यावर नृत्य करायला लावले आहे. ते नृत्यही भडक आणि अतिरेकी आहे. इतकेच नाही तर चित्तोड सर केल्यावर हा राजा वेड्यासारखा एकटाच पद्मावतीच्या शोधात धावत पायऱ्या चढउतार करताना चित्रपटात दिसतो. तेव्हा भन्साळीला हात जोडून एकच सांगावेसे वाटते की, बाबारे, तू ‘ब्लॅक’ काढ, दिले दे चुके सनम काढ, पण यापुढे इतिहासावर चित्रपट काढू नको. अल्लाउद्दीन खिलजी खलनायक म्हणून रंगवताना इतकी खालची पातळी गाठावी? एका राजाला, एका योद्ध्याला खलबली म्हणत माकडासारख्या उड्या मारायला लावायच्या? ‘शोले’ चित्रपटातील गब्बर त्या अल्लाउद्दीन खिलजीपेक्षा चांगला रंगवला आहे. भन्साळींनी तर त्याचा पार जोकर करून टाकला आहे.



हा चित्रपट खरं तर राणा रतनसिंह यांच्यावर असायला हवा होता. राणी पद्मावती यांनी त्यांना कशी साथ दिली यावर भर द्यायला हवा होता. पण राणा रतनसिंह यांना चित्रपटात खुजे करून टाकले आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्व बहरतच नाही. त्यातच भन्साळींनी राणा रतनसिंह आणि राणी पद्मावती यांची प्रणयदृश्ये दाखवली आहेत. भन्साळी असे का करतात कळत नाही? चित्तोडचा राजा आणि चित्तोडची राणी म्हटलं की, धीरगंभीर, स्वाभिमानी, लढाऊ व्यक्तिमत्त्वं समोर येतात. आपल्या राजा आणि राणीची एक प्रतिमा जनमानसात असते. ही प्रतिमा उभारून येईल अशी दृश्ये दाखविण्याऐवजी आपला राजा आणि राणी प्रणयात रमली आहेत, हे पाहायला भारतीयांना आवडणार नाही. दोन श्रेष्ठ व्यक्तिमत्त्वांमधील प्रेमाची भावनाही संयमाने दाखविली पाहिजे. दोन फुलं जवळ आणली तरी प्रेम व्यक्त होतं. प्रेम दाखवायचे म्हणजे मादकता दाखवायची, हा विचारांचा कमकुवतपणा आहे.

भन्साळींनी पेशवा बाजीरावाला नाचवलं, काशीबाई आणि मस्तानीच्या भावना समजून न घेता त्यांचे एकत्र नृत्य दाखवले. ‘पद्मावत’मध्ये तर भन्साळींनी सर्व मर्यादा ओलांडल्या आहेत. हा चित्रपट म्हणजे भव्यदिव्य पोकळ सेट आहे. या चित्रपटाला विरोध झाला ते योग्यच आहे. हा विरोध हाणून पाडून कमाई खेचण्यासाठी भन्साळींनी जशी आपली सर्व हुशारी पणाला लावली, तशी कथानकावर आणि व्यक्तिमत्त्व बांधणीवर ती खर्च करायला हवी होती. पण आडातच नाही तर पोहऱ्यात येणार कुठून? ऐतिहासिक चित्रपट करताना जनतेच्या हृदयातील प्रतिमा जपणे जितके आवश्यक आहे, तितकेच आपल्या पुढच्या पिढीसमोर ही व्यक्तिमत्त्वे कशी आणतो आहोत, याला खूप महत्त्व आहे. पेशवा बाजीरावाचे शौर्य माहीत नाही, पण त्यांच्या ‘मल्हारी’ नृत्याची ओळख राहणार, काशीबाई आणि मस्तानी यांचा टोकाचा संघर्ष जाणत नाही, पण त्या ‘पिंगा’ गाण्यावर एकत्र थिरकल्या हे लक्षात राहणार आणि आता अल्लाउद्दीन खिलजीची अतिक्रमणे ज्ञात नाहीत, पण स्पर्धेत ‘खलबली’चे नृत्य करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा इतिहास पुढल्या पिढीला देण्याचे पाप भन्साळींनी केले आहे.

आता भीती वाटते की, उद्या भन्साळी प्रभू श्रीराम आणि सीतेवर चित्रपट काढेल. त्यात सीता माता आणि शूर्पणखा एकत्र नृत्य करतील आणि रावण माकडचाळे करीत उड्या मारेल. आपण हे सहन करू शकतो का? व्यक्तिस्वातंत्र्य आणि व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य इतके अनिर्बंध असता कामा नये. म्हणूनच भन्साळींना यापुढे ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वांवर चित्रपट काढण्यापासून रोखायला हवे. ऐतिहासिक चित्रपट हाताळण्याची बौद्धिक उंची भन्साळी यांच्याकडे नाही. त्यांनी जो बाजार बसवलाय तो आता उठवा!